**रे. दिवाणी मुकदमा नं.९७/२०१७ मधील नि.३८ वरील आदेश**
**(शशिकांत हिंदुराव कुराडे वि. हिंदुराव बाबुराव कुराडे वगैरे)**
**(CNR:MHSN12000785-2017)**

१. वादीतर्फे सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्ड आणणेसाठी झालेला विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

सदर कामातील प्रतिवादी क्र.२ सुशिला हिंदुराव कुराडे हे दिनांक २७/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस वादी यांना विलंब झालेला आहे. सदर वादी यांना दाव्याचे कामी मुदतीत वारस रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेस जाणूनबूजून विलंब केलेला नाही. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे न झालेस वादी यांचे अपरिमित व पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहेच. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले नाही. सबब सदर अर्ज त्यांचेविरुध्द विना म्हणणे चालविणेत आला.

४. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर कामी जर वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत आला तर त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरचा अर्ज मंजूर झाला तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे दाव्याच्या निराकरणासाठी त्याची मदत होणार आहे. याकामी वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.३८ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२ सुशिला हिंदुराव कुराडे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब र. रु. २००/- सरकार जमा करणेचे अटीवर माफ करण्यात येतो.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.09.28 12:17:59 +05'30'

पलूस ( आय. ए. वाय. ए. खान )
दिनांक-२६/०९/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 26/09/2022 |
| Signed by P. O. on | : | 26/09/2022 |
| Uploaded on | : | 28/09/2022 |